# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १६/०१/२०१२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दिनांक १६/०१/२०१२ रोजी सभा सुचना क्र. २१ दि. १०/०१/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात दुपारी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्रीम. कल्पना महेश म्हात्रे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सभापती |
| २. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ५. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ७. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ८. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ९. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १०. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ११. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १२. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| १३. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १४. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १५. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १६/०१/२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २१, दि. १०/०१/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.)

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, मी एक पत्र दिलेले आहे. २ (के) खाली घेण्याकरीता प्रस्ताव दिलेला आहे. तर त्याबद्दल विचार करण्यात यावा.

**नगरसचिव :-**

(नगरसचिवांनी २ (के) खाली आलेला प्रस्तावाचे वाचन केले.) हा प्रस्ताव घेण्यास सगळयांची मान्यता आहे का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, असा विषय चार कामामध्ये झालेला आहे. व्यायामशाळा आहे राईची, आता अस माहित पडले की, मा. आयुक्त साहेब काही ठिकाणी गेले आणि जे वर्षानुवर्षे संस्थेकडे किंवा मंडळाकडे होती. ती सर्व त्यांनी सिल केलेली आहे. किंवा त्यांच्याकडून अधिकार काढून घेतलेले आहे. म्हणून माझ्याकडे ३ पत्र आलेले. आपला हा चांगला विषय आहे. जर स्टँडींगच्या अधिकारामध्ये असेल तर सन्मा. नगरसेकव अनंत पाटील यांचा विषय आहे. घोडबंदरची शिक्षण संस्था आहे त्याचे दोन रुम खाली करायला लावले आहेत. तर ते विषय एकत्र करुन पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**जुबेर इनामदार :-**

पूढच्या मिटींगमध्ये घ्या. पण हा विषय धारावी देवीचा आहे. तिथे नागरिक जातच असतात. आपण विषय जेवढा लांबवू तेवढ ते लांबतच राहणार. आणि ते आपल्या अधिकारात आहे.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांबरोबर माझी या विषयाबद्दल चर्चा झाली. मा. आयुक्त साहेब स्वतःच हा विषय मिटींग मध्ये आणणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, समाजमंदिर बाकीचे सिल केले किंवा त्या ठिकाणी दुसरे काम केल असेल तर ठिक आहे. पण, हा विषय कसा झाला की, याच्यामध्ये लोकांच्या भावना जुडलेल्या आहेत.

**मा. सभापती :-**

माझी सुध्दा त्यांच्याशी तिच चर्चा झाली. आणि ते बोलले की, आपण त्यांना देवू या.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेबांनी विषय नाही आणले तर?

**मा. सभापती :-**

नाही आणला तर आपण घेवू.

**स्टिवन मेंन्डोसा :-**

सगळे एकत्र विषय आणू ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

घोडबंदर शाळेचे दोन रुम बंद केले आहे इकडची व्यायामशाळा बंद केली आहे.

**बर्नड डिमेलो :-**

आमच्या उत्तनला, पालीला गाव जमातीची जागा आहे ती दिलेली आहे. आता त्या ठिकाणी महापालिकेने बांधकाम केल तर महापालिकेची इमारत झाली. पण प्रश्न असा आहे की, तिथे अंगणवाडी, गावकीची न्याय निवाडे होतात. त्यांना पण नोटिस बजावलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

बाकीच्या समाज मंदिर कामाकरीता वापरण्यात येतो. तो उद्देश दुसरा. पण हा सामाजिक आणि धार्मिक विषय आहे. लोकांच्या भावना जुडलेल्या आहेत.

**मा. सभापती :-**

हा प्रस्ताव आयुक्त साहेबांच्या संमतीने घेण्यात यावा.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेबांनी हा प्रस्ताव नाही घेतला तर?

**मा. सभापती :-**

नाही घेतला तर आपण घेवू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, तुम्ही प्रशासनाला आदेश द्यावा. जे-जे आदेश काढले शाळेला, व्यायाम शाळेला, समाज मंदिराला त्यांची सर्व माहिती घेवून आपल्याकडे आणावी आणि हा विषय त्यांनी मिटींगमध्ये घेवून यावे. प्रशासनाने आणला तर ठिक आहे. नाहीतर तुमच्या अधिकारामध्ये एकमताने घेण्यात यावा.

**मा. सभापती :-**

प्रशासनाने ज्या-ज्या समाजमंदिर बंदी आणलेली आहे. सिल केले ते सगळे विषय प्रशासनाने आयुक्तांच्या मान्यतेने घेण्यात यावे. जर त्यांनी नाही घेतले तर आम्ही आमच्या अधिकारात घेवू.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०७, दि. २२/१२/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**शशिकांत भोईर :-**

पान नं. ४ मध्ये माझ वक्तव्य आहे. परंतु, मी पण प्रशासनामध्ये ज्यावेळी चर्चा केली फक्त मा. महासभा याच्यामध्ये चर्चा केलेली होती. आणि पाण्याच्या अंदाजपत्रक फक्त त्यांनी एवढच लिहिल की, पाणी पूरवण्याच्या लाईन आहे. तर त्यांनी फक्त स्थायी समितीला ५० लाखाची आर्थिक, प्रशासकीय मंजुरीसाठी दिलेली आहे. पण, याच्यामध्ये कुठे उल्लेख नव्हता. किती लाखाच्या पाईप लाईन मागवणार त्याचा उल्लेख नाही. तरी त्याकरीता आम्ही ठराव दिलेला की, या ठरावाला आमचा विरोध आहे. याच्यात उल्लेख नाही किती अमाऊंट आहे ती? ठराव पण माझ्याकडे आहे. मा. महासभा दि. १३/४/२००५ रोजी हा ठराव झालेला आहे. त्याच्यात फक्त एकच लाईन घुसवली. तसेच या पुढे रु. ५० लक्ष रकमेपर्यंतची कामे प्रशासकीय व आर्थिक मान्यतेकरीता मा. स्थायी समिती समोर ठेवण्यात यावे. पण याच्यात कुठेही पैशाचा उल्लेख नाही आहे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, पान नं. १३ वर त्यावेळचे जे प्रोसायडिंग ऑफिसर होते डी.एम.सी. पानपट्टे साो, नगरसेविका नयना म्हात्रे यांच्या वक्तव्यावर ते बोट दाखवून बोलत होते त्यांच्या बरोबर, त्यावेळी मी सांगितले होत की, लोकप्रतिनिधीशी बोलतेवेळी ही पध्दत नाही बोलायची. ते सर्व गाळलेल आहे. काहीच आलेल नाही.

**नगरसचिव :-**

चेक करुन घेतो. आणि करेक्शन करुन घेतो.

**मर्लिन डिसा :-**

सचिव साहेब, मिरा भाईंदर ख्रिसमस कार्निवल, पान नं. १३ मध्ये , आणि मॅनव्होल पाहिजे, मॅन्युअल नाही.

**बर्नड डिमेलो :-**

दि. २२/१२/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०७ :-**

दि. २२/१२/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ९३ :-**

दि. २२/१२/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०८, A.G. Audit (2007-2011) आक्षेप क्र. 8 Creation of Loan Fund (special fund) for both schemes of water supply and disposal of solid waste material (Sewerage disposal).

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, या गोषवाऱ्यामध्ये तुम्ही म्हंटलय की, वरिल विषया संदर्भात अे.जी. यांनी नोंदवलेला आक्षेप नं. ८ सोबत जोडण्यात आलेला आहे. तर तो कुठे आहे ?

**नगरसचिव :-**

प्रशासनाने जेवढा गोषवारा दिला तोच दिला आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही गोषवाऱ्यामध्ये कसे लिहिले?

**नगरसचिव :-**

त्यांनी गोषवारा प्रशासनाला दिलेला आहे तोच आलेला आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही आक्षेप दिला पाहिजे ना. मग आक्षेप दिला कसा.

**नगरसचिव :-**

गोषवारा तसाच दिलेला आहे.

**अनिल सावंत :-**

अहो हेडींग नाही. गोषवाऱ्यात दिलेला आहे. आक्षेप सोबत जोडण्यात आलेला आहे. मग तो सोबत जोडायला पाहिजे ना.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो आपले जे पूर्वी रिझर्व्ह फंड ठेवलेले होते. एक विशेषसाठी ठेवण्यात आलेले असतात. तर एम.एम.ॲक्ट १९६५ तत्कालीन नगर परिषद असताना एम.एम.ॲक्ट १९६५ चा जो कायदा होता त्याचा ५०-५ अन्वये पाणी पुरवठा राखीव निधी हे क्रिएट करुन ठेवायचा होता आणि एक कर्ज परत फेडण्यात येईल. तर हे आपण पूर्वी ठेवलेल होत. त्यानंतर महानगरपालिका झाल्यानंतर त्यांनी अद्यापपर्यंत नोंद केली नव्हती. परंतु, या वेळच्या ऑडीट मध्ये त्यांनी अस सांगितल की, त्याच नामानंतर करुन घ्या. बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ च सेक्शन ९१ तर ९१ मध्ये ९१-अे, आणि ९१-बी हे जे नावे दिलेली आहेत. ती

त्याच्यावर स्टँडीगच्या मान्यतेने नोंद करुन घ्या. म्हणून तो विषय तुमच्या पुढे आणलेला आहे. मग त्यांना तिकडून आम्ही हे सगळ पाठवून देणार नावात फक्त बदल करायचा आहे.

**जुबेर इनामदार :-**

बेलवटे साहेब, याच्यामध्ये ४ नंबर जो दिलेला आहे. अनस्पेंड बॅलेंस कॅन बी इनवेस्टेड. याच्यामध्ये तुम्ही तो महानगरपालिका अधिनियम प्रमाणे बदलून करा. त्याच्यावर कुठे एम्फसाईज केलेल नाही. अनस्पेंड बॅलेंस कॅन बी इनवेस्टेड अप्रूवल अॅट स्टँडीग कमिटी.

**शरद बेलवटे :-**

लास्टला त्यांनी दिलेल आहे. It was stated in reply that as per section 91 A at BPMC act 1949 the existing reserve fund of water supply would be converted into special loan found after the approval at standing committee. तर आपण काय करतो ते पुन्हा बी साठी करतो. आणि बी अवेलेबल आहे तर त्याच्यात कर्ज परत फेडणार आपण. जल आणि मलःप्रवाह निधी करायचा आहे. तो नुसता वॉटर सप्लाय रिझर्व्ह फंड अस आपल्याकडे त्याचे नाव आहे.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे क्रिएट नाही केले.

**शरद बेलवटे :-**

आपल्याकडे क्रिएट केलेल आहे.

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्यामध्ये दिल आहे. क्रिएट केल म्हणून.

**शरद बेलवटे :-**

आपल्याकडे क्रिएट केलेल आहे. परंतु, तत्कालिन नगरपरिषदेच्या नावाने ते आहे.

**जुबेर इनामदार :-**

नंतर ते बदलच केले नाही.

**शरद बेलवटे :-**

आपल्याला फक्त नामांतर करायचे आहे.

**एस.ए.खान :-**

ते केल नाही ना.

**शरद बेलवटे :-**

त्यांनी आजपर्यंत ऑब्जेक्शन घेतले नव्हते. प्रत्येक वेळा ते चेक करायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तत्कालीन नगरपालिका असल्यापासून राखीव निधी अंतर्गत **M.M Act-1965 चे कलम 50 (5) अन्वये पाणीपुरवठा राखीव निधी मध्ये रक्कम रुपये 17.87 कोटी गुंतवणुक करुन स्थापना करण्यांत आलेली आहे. तसेच कर्जपरतफेड राखीव निधी अंतर्गत 7.74 कोटी रुपये गुंतवणुक करण्यांत आलेली होती.** BPMC Act-1949 चे कलम 91 नुसार विशेष निधी स्थापना करणेबाबतची तरतुद पाहता कलम 91(A) नुसार "एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह" विनियोग कर्ज निधी 91(B) नुसार "जल व मलप्रवाह निधी" स्थापन करणे बंधनकारक आहे.

तरी M.M Act-1965 अन्वये वरील प्रमाणे स्थापन करण्यात आलेले निधी यापुढे BPMC Act-1949 चे कलम 91 नुसार अनुक्रमे **91(A) "एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह" विनियोग कर्ज निधी व 91(B) नुसार "जल व मलप्रवाह निधी" असे संबोधण्यात येतील. यास आजची सभा मंजूरी देत आहे.**

**भगवती शर्मा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १०८ :-**

A.G. Audit (2007-2011) आक्षेप क्र. 8 Creation of Loan Fund (special fund) for both schemes of water supply and disposal of solid waste material (Sewerage disposal).

**ठराव क्र. ९४ :-**

तत्कालीन नगरपालिका असल्यापासून राखीव निधी अंतर्गत **M.M Act-1965 चे कलम 50 (5) अन्वये पाणीपुरवठा राखीव निधी मध्ये रक्कम रुपये 17.87 कोटी गुंतवणुक करुन स्थापना करण्यांत आलेली आहे. तसेच कर्जपरतफेड राखीव निधी अंतर्गत 7.74 कोटी रुपये गुंतवणुक करण्यांत आलेली होती.** BPMC Act-

1949 चे कलम 91 नुसार विशेष निधी स्थापना करणेबाबतची तरतुद पाहता कलम 91(A) नुसार ''एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह'' विनियोग कर्ज निधी 91(B) नुसार ''जल व मलप्रवाह निधी'' स्थापन करणे बंधनकारक आहे.

तरी M.M Act-1965 अन्वये वरील प्रमाणे स्थापन करण्यात आलेले निधी यापुढे BPMC Act-1949 चे कलम 91 नुसार अनुक्रमे **91(A) ''एकत्रित पाणीपुरवठा व मलप्रवाह'' विनियोग कर्ज निधी व 91(B) नुसार ''जल व मलप्रवाह निधी'' असे संबोधण्यात येतील. यास आजची सभा मंजूरी देत आहे.**

**सुचक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल अनुमोदन :- श्री. भगवती शर्मा**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०९, कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग) प्रशासनाने याच्यावर गोषवारा दिलेला नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब विषय मागे घेण्यात येत आहे.

**भगवती शर्मा :-**

विषय मागे का घेण्यात येत आहे ?

**दिपक खांबित :-**

आम्ही अर्जंटली विषय दिला होता. पण गोषवारा तयार होवू शकला नाही. त्यामुळे गोषवाऱ्या सोबत पुढच्या वेळेला विषय येईल.

**अनिल सावंत :-**

स्टँडींगला कुठे अधिकार आहेत आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी. ५० लाखाच्या वरती आहे.

**दिपक खांबित :-**

५० लाखा पर्यंत आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय मागे घेण्यात येत आहे. पूढचा विषय घेण्यात यावा.

(मा. सभापतींच्या आदेशाने सदरचा विषय मागे घेण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११०, केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत २० प्राप्त बसेसची निविदा काढणेस मंजूरी देणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

राऊत साहेब, हा विषय तुमचा आहे. तुम्ही त्या विभागाचे प्रमुख आहात. २० बसेस आले पाहिजे ते सगळ ठिक आहे, क्रिस्टल हा जो ठेकेदार आहे तो पेपरमध्ये बातमी देत फिरतो की, मला डेपो नाही दिला की मी सर्व्हिस बंद करणार. भाडेवाढ दिली नाही तर मी बसेस बंद करणार. आणि आता परत हे २० बसेस घ्यायचे आणि उद्या त्याने सर्व्हिस बंद केली तर ?

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो, केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाची जवाहरलाल नेहरु नागरिक पुर्नवृत्ता योजने अंतर्गतचा हा शेवटचा हफ्ता आहे. जो आपल्याला त्या हफ्त्यामध्ये २० बसेस मंजुर झाल्या आणि त्याला २ कोटी ३ लक्ष एवढा निधी मंजुर झाला. ही मागणी आपली जूनीच होती. जो आपला डी.पी.आर. आपण मांडलेला आहे. आणि त्या अंतर्गत ऑलरेडी त्यांनी १ कोटी २लाख रु. रिलिज सुध्दा केले. त्याचे स्टीपुलेशन अस आहे. दि. ३१/३/२०१२ च्या पूर्वी त्यांनी बसेसच पूर्ण बिल्डींग करुन बसेस रस्त्यावर आल्या पाहिजे. टेक्नीकली या सर्व गोष्टी केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. ची ग्रँड युटीलाईज करण्याकरीता म्हणून हा सर्व प्रोसेस करायचा होता. म्हणून हा विषय आणलेला आहे. जेणेकरुन बसेस प्रॉक्युरमेंट कराव्या लागतील. कारण ते जर नाही केले तर ती ग्रँड आपली सर्व लॅप्स होईल.

**जुबेर इनामदार :-**

मार्च पर्यंत बॉडी बिल्डींगचे सर्व काम होणार का ?

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) सो.) :-**

व्हायला पाहिजे. आम्ही ऑलरेडी निविदा काढली. वेटींग स्टँडींग इन अप्रूवल २४ तारखेपर्यंत निविदा मागवण्यात आली आहे. पूढच्या स्टँडींगमध्ये आम्ही ठेवू.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही मला उत्तर जे दिलेले आहे ते योजने अंतर्गत दिलेले आहे. २० बसेस नाही. आपल्या शहरात २०० बसेस आले तरी चांगल आहे. विषय कसा आहे रोज ठेकेदार ज्या पध्दतीने बातम्या पेपरमध्ये देतो. त्याची मागणी आहे आम्हाला डेपो नाही मिळाला की सर्व्हिस बंद करणार म्हणजे तो ब्लॅकमेल करतो. त्याच काय ? उद्या आपण २० बसेस घेवून प्रॉक्युअर करायचं परत आपण त्याला कुठे सांभाळत फिरायचे.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

जागा देणे संदर्भात बांधकाम आणि नगररचना विभागाने सहा. आयुक्त...........

**एस.ए.खान :-**

मा. सभापती मॅडम, सर्व बसेस वेस्टला उभे आहेत. आता आम्ही येताना पण बघितल आहे. वेस्टला जागा पार्किंगसाठी दिली आहे का ? सगळया बसेस तिथे उभ्या आहेत.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती मॅडम, आपल्या ब्रिज खाली जवळ – जवळ ३० एक बसेस अशा ठेवल्यात की, त्याला एकही टायर नाही. मग, त्या बसेस कशाकरीता ठेवलेल्या आहेत? आणि आता परत एवढया बसेसची मंजुरी द्यायची. त्याचा अर्थ काय? परत ठेकेदार असा बोलतो की आमच्या एवढया बसेस रोडवर पळतात. मग, तेवढया बस जागेवर ठेवलेल्या आहेत त्याचा अर्थ काय? त्या दिवशी जावून मी फोटो पण काढले. मला भेटले नाही फोटो. नाहीतर मी आता दाखवायला आणणार होती.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

ज्या बसेस त्या ठिकाणी ठेवलेल्या आहेत. त्या संदर्भात त्यांना आपण दैनंदिन नोटिस देतो की, त्यांच्या एवढयाच बसेस रस्त्यावर आहे आणि दर दिवशी त्यांच्याकडून त्यांच्या एकूण पेमेंट मधून १० हजार रु. चा दंड लावतो.

**नयना म्हात्रे :-**

तुम्ही १० हजार रु. कसे कापता ?

**जुबेर इनामदार :-**

आपण हे पी.पी.पी. तत्वावर घेतो. योजना आहे. त्याचा आपल्याला लाभ घेतला पाहिजे. आज पी.पी.पी. तत्वावर आपली आर्थिक परिस्थिती तशी नाही की, आपण आपला वाटा टाळू शकतो. आपला पालिकेचा हिस्सा आहे. तो आपण भरु शकत नाही. म्हणून आपण पी.पी.पी. तत्वावर दिले आहे. हे पी.पी.पी. तत्वावर ज्याला दिल त्याने उद्या हात वर केला तर तुम्ही काय करणार ?

**नयना म्हात्रे :-**

साहेब हा बसचा ठेका आहे तो दुरुस्तीचा ठेका पण त्याचाच आहे का ?

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) सा़े.) :-**

दुरुस्तीचा ठेका असा नाही आहे. प्रत्येक बसेस दुरुस्त्या करायच्या. आणि सदैव दुरुस्ती.............

**नयना म्हात्रे :-**

साहेब त्या दिवशी मी दिपक सावंत साहेबांकडे गेली होती तर त्यांनी मला अस उत्तर दिल की ठेकेदारांनी २५ बसेस विकल्या. तर ते काय आहे मला कस समजून सांगा.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत सन २०११-१२ या वर्षात २० बसेस मंजूर केलेल्या आहेत.

केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत मंजूर झालेल्या २० बसेसची निविदा काढणेकामी प्रशासकीय मान्यतेस ही सभा बहुमताने मंजुरी देत आहे. परंतु बसेस खरेदी करताना पी.पी.पी. ठेकेदाराकडून प्रथम त्याच्या हिस्याची रक्कम जमा करुन घ्यावी व ती बसेस खरेदी किंवा चेसीज बांधकाम करताना अग्रीम म्हणून बसेस ठेकेदारास अदा करावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, स्थायी समितीला अधिकार आहे का ५० लाखाच्या वरती आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी देण्याचे. त्याचा खुलासा करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, आपण ऑलरेडी मा. महासभेमध्ये १०० बसेसची आर्थिक प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. आणि आपण टप्प्या टप्प्याने मागवणार आहोत असा त्यामध्ये उल्लेख केलेला आहे. म्हणून हा आर्थिक प्रशासकीय मंजुरी घेण्याचा विषय नाही आहे. आपण याच्या आधी मंजुरी दिलेली आहे. म्हणून आपण या विषयावर गांभिर्य घेवू नका.

**अनिल सावंत :-**

मग, हा विषय कशाला आणला? डायरेक्ट घेवून या. आमचा या ठरावाला विरोध आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, प्रशासनाकडून चूक झाली. तर प्रशासनाने आपली चूक मानावी. चूक झाली म्हणून.

**अनिल सावंत :-**

आर्थिक प्रशासकीय मंजुरी करायची आपल्याला ........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आर्थिक प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

**एस.ए.खान :-**

दिलेली आहे. तर मग इथे कशासाठी आणल ?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासन दुरुस्ती करतो ना. प्रिंटीग मिस्टेक झाली.

**जुबेर इनामदार :-**

राऊत साहेब, मी विचारलेल्या प्रश्नाच उत्तर द्या. मा. सभापती महोदय, मी हा प्रश्न विचारलेला आहे. ते पालिकेच्या हिताचा आहे.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) साो.) :-**

याच्यामध्ये प्रकरण क्र. ११० मधला जो गोषवारा आहे त्याच्या मधला पॅरा नं. २ प्रशासकीय व आर्थिक हे वगळून द्यायला पाहिजे होत. ती चूक मान्य करतो. आणि ते वगळून...........

**अनिल सावंत :-**

वगळून काय ? आमची मान्यता कशाला घेता.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय, हे प्रशासकीय आर्थिक मंजुरी नसली तरी निविदा आहे का ?

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महासभेचा ठराव बघून घ्या. मला वाटत १०० बसेसला आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी दिलेली नाही.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) साो.) :-**

ओवर ऑल २५० बसेसची दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी नाही. डी.पी.आर. मंजुर आहे. पण ती मंजुरी नाही. बसेस घेण्यासाठी परचेस करण्यासाठी आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी दिलेली नाही.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) साो.) :-**

ओवर ऑल त्या बसेसची किंमत धरुन डी.पी.आरला मंजुरी दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

डी.पी.आर. बरोबर आहे.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) साो.) :-**

त्याच्यामध्ये अमाऊंट सुध्दा आलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

डी.पी.आर. मंजुर केला होता योजनेकरीता योजनेला मान्यता देण्याकरीता आपण डी.पी.आर. केला होता.

**सुधिर राऊत (उपायुक्त (मु.) साो.) :-**

याच्यामध्ये कॉर्पोरेशन चा जो हिस्सा आहे ना...............

**अनिल सावंत :-**

दॅट इज ॲग्री. ३५ % १५ % ५० %  राज्य शासन, केंद्र शासन ते सगळे बरोबर आहे. पण तुम्ही १०० बसेसच म्हणता की आर्थिक आणि प्रशासकीय मंजुरी मा. महासभेने दिलेली आहे. माझ्या मताप्रमाणे ते नाही आहे. तुम्ही ठराव बघून घ्या.

**दा.अ.पाटील :-**

५० बसेसच दिलेल आहे.

**अनिल सावंत :-**

आपण ऑलरेडी ५० बसेस घेतलेल्या आहेत.

**दा.अ.पाटील :-**

आपल्या डी.पी.आर. मध्ये आहे.

**जुबेर इनामदार :-**

असु द्या ना. डी.पी.आर. कशाकरीता होता.

**अनिल सावंत :-**

पुढच्या मिटींगमध्ये हा विषय घ्या. प्रशासनाने व्यवस्थित अभ्यास करावा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठराव मंजुर करा. जायच आहे त्यांना ते अपिलमध्ये जातील.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

उपायुक्त साहेब, मी तुम्हाला ठेक्या संदर्भात प्रश्न विचारला होता त्याच काय झाल ? त्याप्रकारे तो मिडीयामध्ये बातम्या देतो.

**मा. सभापती :-**

तुम्ही ठराव करा.

**जुबेर इनामदार :-**

आम्ही ठराव करणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, आतापर्यंत ठेकेदाराची जी वागणूक होती. म्हणजे महापालिकेचे अजूनही त्याच्याकडे पैसे बाकी आहे. तर मा. महासभेत विषय आला पाहिजे. ठेकेदारावर कारवाई करा म्हणून. पण हा विषय आणत नाही. ठेकेदाराकडे महापालिकेचे कोटी रुपये बाकी आहेत. हा विषय मा. महासभेमध्ये आला पाहिजे होता. कोटयांचा विषय आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

चर्चा केली होती.

**अनिल सावंत :--**

मा. महासभेचा विषय तुम्ही स्टँडीगमध्ये कशाला घेता ? आम्ही लक्षवेधी आणली होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रशासनाचा डी.पी.आर. मंजुर असताना खरेदी करु शकता आणि तुम्हाला वाटत असेल डी.पी.आर. खरेदी करु शकत नाही तर देवू द्या.

**शशिकांत भोईर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत सन २००९-१० मध्ये ५० बसेस मंजूर केलेल्या आहेत. त्या सर्व ५० बसेस मिरा भाईंदर परिवहन उपक्रमात दाखल झालेल्या आहेत. सन २०११-१२ या वर्षात केंद्र शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेस अजून २० बसेस मंजूर केलेल्या आहेत.

तरी सदर बसेसची खरेदी करावयाची असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समितीची प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेस शिफारस केली आहे. परंतु, मा. स्थायी समितीस ५० लाख रुपये पर्यंत रक्कमेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे सदरचा विषय मा. स्थायी समिती मंजूर करु शकत नाही. तरी सदर विषय मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा असा ठराव मांडीत आहे.

**एस.ए.खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ११० करीता २ ठराव आले तर सचिव साहेब मतदान घेण्यात यावे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११० करीता दोन ठराव आलेले आहे. पहिल्या ठरावाचे सुचक बर्नड डिमेलो अनुमोदक ओमप्रकाश अग्रवाल. दुसऱ्या ठरावाचे सुचक शशिकांत भोईर अनुमोदक एस.ए.खान अनुक्रमे दुसरा ठराव वाचून मतदानास टाकतो. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत सन २००९-१० मध्ये ५० बसेस मंजूर केलेल्या आहेत. त्या सर्व ५० बसेस मिरा भाईंदर परिवहन उपक्रमात दाखल झालेल्या आहेत. सन २०११-१२ या वर्षात केंद्र शासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेस अजून २० बसेस मंजूर केलेल्या आहेत.

तरी सदर बसेसची खरेदी करावयाची असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समितीची प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेस शिफारस केली आहे. परंतु, मा. स्थायी समितीस ५० लाख रुपये पर्यंत रक्कमेस प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे सदरचा विषय मा. स्थायी समिती मंजूर करु शकत नाही. तरी सदर विषय मा. महासभेपुढे ठेवण्यात यावा असा ठराव मांडीत आहे. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे. या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहे.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब इन्होंने जो ठराव पढा था वह अलग है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब त्यांनी वाचलेला ठराव आणि आता आपण वाचलेल्या ठरावामध्ये फरक आहे. तर पहिला ठराव तुम्ही मंजूर घ्यायचा हा नाही.

**शशिकांत भोईर :-**

तोच ठराव आहे. मा. महासभेमध्ये ठेवा.

**अनिल सावंत :-**

त्यांचा राईटिंगमध्ये ठराव आलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जे आधी बोललेले आहे तोच ठराव घेण्यात यावा.

**जुबेर इनामदार :-**

तो लेखी दिलेला ठराव आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, आधी जो ठराव वाचन झालेला आहे ते टॅली करा.

**नगरसचिव :-**

हो टॅली करतो.

**अनिल सावंत :-**

राईटिंगमध्ये दिलेले आहे.

**नगरसचिव :-**

पहिल्या ठरावाचे वाचन करतो. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत सन २०११-१२ या वर्षात २० बसेस मंजूर केलेल्या आहेत.

केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत मंजूर झालेल्या २० बसेसची निविदा काढणेकामी प्रशासकीय मान्यतेस ही सभा बहुमताने मंजुरी देत आहे. परंतु बसेस खरेदी करताना पी.पी.पी. ठेकेदाराकडून प्रथम त्याच्या हिस्याची रक्कम जमा करुन घ्यावी व ती बसेस खरेदी किंवा चेसीज बांधकाम करताना अग्रीम म्हणून बसेस ठेकेदारास अदा करावी. या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हातवर करायचे. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे.

**मा. सभापती :-**

बर्नड डिमेलो यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ८ मते आहे. तर हा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११० :-**

केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत २० प्राप्त बसेसची निविदा काढणेस मंजूरी देणेबाबत.

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमास केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत सन २०११-१२ या वर्षात २० बसेस मंजूर केलेल्या आहेत.

केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत मंजूर झालेल्या २० बसेसची निविदा काढणेकामी प्रशासकीय मान्यतेस ही सभा बहुमताने मंजुरी देत आहे. परंतु बसेस खरेदी करताना पी.पी.पी. ठेकेदाराकडून प्रथम त्याच्या हिस्याची रक्कम जमा करुन घ्यावी व ती बसेस खरेदी किंवा चेसीज बांधकाम करताना अग्रीम म्हणून बसेस ठेकेदारास अदा करावी.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| १) श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | १) श्री. शशिकांत भोईर | निरंक |
| २) श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | २) श्री. जुबेर इनामदार | |
| ३) श्री. स्टिवन जॉन मेन्डोंसा | ३) श्री. एस. ए. खान | |
| ४) श्री. भगवती शर्मा | ४) श्री. अनिल सावंत | |
| ५) श्रीम. नर्मदा वैती | ५) श्री. लक्ष्मण जंगम | |
| ६) श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | ६) श्रीम. मर्लिन डिसा | |
| ७) श्री. मोहन जाधव | ७) श्रीम. नयना म्हात्रे | |
| ८) श्री. बर्नड डिमेलो | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १११, निविदांस मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**भगवती शर्मा :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मिरा एम.आय.डी.सी. येथील सातकरी तलावा जवळ धोबीघाट बांधणे. (फेर निविदा)<br>**१) मे. महेश्वर बिल्डर्स** | रू. ३५,००,०००/-<br>**10.95 % कमी दराने** |

वरील कामाच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

तरतुद २० लाखाची आहे. या आर्थिक वर्षामध्ये ३५ लाखाच आणलेले आहे.

**दिपक खांबित :-**

आपण हे सगळी कामे टप्प्या टप्प्याने करतो.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १११ :-**

निविदांस मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ९६ :-**

| अ.क्र. | कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर |
|---|---|---|
| १ | मिरा एम.आय.डी.सी. येथील सातकरी तलावा जवळ धोबीघाट बांधणे. (फेर निविदा)<br>**१) मे. महेश्वर बिल्डर्स** | रू. ३५,००,०००/-<br>**10.95 % कमी दराने** |

वरील कामाच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा        अनुमोदन :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११२, मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**मा. सभापती :-**

सदर प्रकरणाचे अवलोकन करण्यात आले.

**प्रकरण क्र. ११२ :-**

मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

मा. आयुक्त सो. यांच्या मंजूरीने ई-टेंडरींग पध्दतीने खालील कामाच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | कामाचा तपशिल | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे. रमेश ॲग्रोकेम कॉर्पोरेशन | Pyrosene Oil - E | रु. ८,००,०००/- |
| २ | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | Malathion Powder 5% DP | रु. ३,१०,०००/- |
| ३ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | Deltamethrin 2.5% Flow | रु. ९,४८,५००/- |
| ४ | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन | नॅपथेलीन क्युब, ॲसीड (ग्रेड - १), फुल झाडु, खराटे, डस्टर, ब्रश (लादी सफाई) | रु. २,१८,३००/- |
| ५ | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन | काळे फिनाईल | रु. १,२८,०००/- |
| ६ | मे. रमेश ॲग्रोकेम कॉर्पोरेशन | Pyrosene Oil - E | रु. ८,००,०००/- |

उपरोक्त अ.क्र. ०१ ते ०६ या कामाचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**मा. सभपती :-**

आजची सभा संपली असे मी जाहीर करते.

**सभा संपल्याची वेळ - दुपारी १२.४५ वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**